जाहिर ई-निविदा सुचना – पहिली वेळ
सातारा जिल्हा परिषद
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, (यांत्रिकी उपविभाग)

सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे खालील खरेदीची ई-निविदा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचे कार्यक्षेत्रातील योग्य त्या पुरवठादारांकडुन मागवित आहेत. संपुर्ण निविदा प्रक्रीया ही ऑनलाईन (ई-टेंडरींग) पद्धतीने राहिल.

| अ.नं. | कामाचे नांव | बयाणा रक्कम | कालमर्यादा | कोया निविदा नमुन्याची किंमत रुपयांत |
|---|---|---|---|---|
| १ | १५० मि.मी. व ११५ मि.मी. डी.टी.एच. विंधण विहीर खोदाई व तद्अनुषंगीक कामे | २५,०००.०० | निविदा मंजुरी पासुन १ वर्ष | १०००.०० |

निविदे संदर्भातील कागदपत्रे, अटी व शर्ती यांची माहिती पाहण्यासाठी व डाऊनलोड करणेसाठी "http://mahatenders.gov.in" या वेबसाईटवर दि. १६/०१/२०१८ रोजी १५.०० पासुन दि. ३०/०१/२०१८ रोजी १५.०० वाजे पर्यंत उपलब्ध राहिल. निविदा धारकाने परिपुर्ण निविदा ही दि. १६/०१/२०१८ रोजी १५.०० पासुन दि. ३०/०१/२०१८ रोजी १५.०० वाजे पर्यंत इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये "http://mahatenders.gov.in" या वेबसाईटवर सादर करावयाच्या आहेत. निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कमे मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. सातारा यांचे नांवे ऑनलाईन जमा करणेची आहे व त्याची रिसीट निविदा कागदपत्रा सोबत ऑनलाईन अपलोड करावी. कव्हर १ मध्ये Net Banking द्वारे ऑनलाईन जमा रक्कमेची पोहोच/प्रत नसलेस आपली निविदा उघडणेत येणार नाही. निविदा दि. ३१/०१/२०१८ रोजी १५.०० वाजता उघडणेत येतील.

निविदा स्विकृत्तीचे बंधन निविदा मंजूर करणाया अधिकायावर नाही. काहीही कारण न देता कोणतीही निविदा नाकरारणेचा अगर स्विकारणेचा अधिकार सक्षम अधिकायाने राखून ठेवला आहे. निविदा नाकारणे बद्दल कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही x x x
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, सातारा.**

# निविदेसोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रे

निविदेसोबत तांत्रिक लिफाफयात खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

अ) विंधन यंत्र मालकी हक्काबाबतची पूराव्याची कागदपत्रे.

ब) आयकर पॅनकार्ड

क) विभागीय परिवहन अधिकारी यांचेकडील विंधन यंत्राचे अद्यावत वाहनाची नोंदणी व कराधान पुस्तक व इन्शुरन्स प्रमाणपत्र.

ड) फर्म भागीदारीत असल्यास भागीदारीबाबतचा करारनामा

इ) बंदपत्र.

ई) अटी व शर्ती मान्य असलेबाबत अटी व शर्तीवर निविदाधारकांनी स्वाक्षरी रबर स्टॅम्पसह करावी.

वरील १ मधील अ ते ग मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांच्या व नोंदणी फर्मच्या प्रती स्कॅन करुन त्या **upload** कराव्यात.

# ई-निविदा माहिती अटी व शर्ती

| | |
|---|---|
| ०१ | खाजगी विंधण यंत्राचे मुळ मालक किंवा विंधण यंत्राचे मुळ मालकासोबत भागीदारी केलेल्या कंत्राटदारांनीच ई – निविदा करावी. |
| ०२ | वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर प्रक्रियेद्वारे ऑनलाईन करण्यात येईल या निविदेसंबंधीत या पुढील सर्व सुचना पत्रे ऑनलाईन करण्यात येईल. |
| ०३ | वरील कामांची संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १६/०१/ २०१८ रोजी १५.०० वाजे पासून ते दिनांक ३०/०१/२०१८ रोजी १५.०० वाजेपर्यंत पाहता येतील व डाऊन लोड करता येईल. |
| ०४ | वरील कामाचे निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ३०/०१/२०१८ रोजी १५.०० वाजेपर्यंत भरता येतील. |
| ०५ | सदर कामाचे निविदा करीता रक्कम रुपये १,०००/- निविदा फॉर्म रक्कम व बयाना रक्कम रुपये २५,०००/- या दोन्ही रक्कमा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर On Line Payment Procedure प्रमाणे भरायचे असून त्या करता संकेत स्थळवरील On Line Payment Procedure लक्षात घ्यावे. |
| ०६ | सदर अटी व शर्ती मध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या मुळ प्रती तांत्रिक लिफाफा क्रमांक ०१ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. |
| ०७ | सदर कागदपत्रे व निविदा फॉर्म फी रुपये १०००/- व बयाना रक्कम रुपये २५,०००/- ची पुर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरविले जाईल. |
| ०८ | स्कॅन करुन सादर केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रति लिफाफा क्रमांक ०१ मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. |
| ०९ | उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. |
| १० | पूर्ण माहिती भरलेला लिफाफा क्रमांक ०१ ऑनलाईन पद्धतीने ३१/०१/२०१८ रोजी १५.०० वाजता www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा येथे उघडण्यात येईल. |
| ११ | पात्र लिफाफा धारकास वित्तीय लिफाफा क्रमांक ०२ उघडण्याची वेळ व दिनांक ई-मेल पत्त्यावर कळविण्यात येईल. |
| १२ | ई-निविदासोबत निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम रुपये संकेत स्थळावर Online Payment Procedure द्वारे भरुन स्कॅन केलेल्या मुळ प्रती जोडणे आवश्यक राहील. बयाना रक्कम भरण्यापासून कोणाला सुट राहणार नाही. |
| १३ | ई-निविदा कोणतेही कारण न दाखवता मंजूर करणे अथवा नामंजूर करणे बाबतचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांना राहील. |
| १४ | मा. संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य, पुणे-०५ यांचेकडून |

| | |
|---|---|
| | दिनांक ०४ सप्टेंबर २०१७ रोजी प्राप्त झालेल्या शासकीय मंजूर दरापेक्षा जास्त दर अपेक्षित असणाऱ्यांनी कृपया निविदा भरु नये. |
| १५ | विंधण विहीर खुदाई कार्यक्रम, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा व उप अभियंता(यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांच्या नियंत्रणाखाली राहील. |
| १६ | ई-निविदा मंजूरी नंतर करारनामा करून द्यावा लागेल. |
| १७ | विंधण विहीर खुदाई इत्यादी कामाचा आदेश दिल्यापासून १५ दिवसाचे आत काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. |
| १८ | विंधन विहीरीची कामे जिल्हामध्ये कोठेही, उप अभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी दिलेल्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे त्याच गावात व त्याच ठिकाणी करण्यात यावी. शासकीय जागा नसलेल्या ठिकाणी विंधन विहीर खुदाई करण्यात येऊ नये, शासकीय जागा नसेल त्या ठिकाणी योग्य कागदपत्रे उदा. स्टॅम्प पेपरवर दान पत्र घेतल्याशिवाय विंधन विहीर करण्यात येऊ नये, विंधन विहीर खुदाई काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करण्यास वैध अडचणी उत्पन्न झाल्यास यांत्रिकी उपविभाग, जि.प.सातारा तपासणी करुन पुन्हा मर्यादित कालावधी साठी मुदत वाढ देईल. |
| १९ | मा.संचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा पुणे यांनी वेळोवेळी विहीत केलेल्या वैशिष्ठे (Specifications) पी.व्ही.सी. केसींग वापरण्यात यावेत. वैशिष्ठे (Specifications) नुसार नसल्यास दरात कपात करण्यात येईल. विंधन विहीर खुदाई करतेवेळी (एम.एच/पी.व्ही.सी.) केसींग पाईप कठीण खडकात किमान ०.५ मिटर जाईपर्यंत तसेच जमिनीच्या वर ०.३ मिटर ठेवण्यात यावा केसींग पाईप ग्राऊटींग सह टाकण्यात यावा. सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. |
| २० | विंधण विहीर खोदण्याचे काम केल्याचे विहीत प्रमाणपत्र (यांत्रिकी उपविभाग, जि.प.सातारा कडील विहीत प्रमाणपत्र प्रमाणे संबंधित सरपंच / सचिव ग्रामपंचायतीचे स्वाक्षरीसह सादर करावे.) |
| २१ | पाणी क्षमता चाचणी ९० अंश व्ही नॉज द्वारे सुमारे २ तास घेण्यात यावी. कमी क्षमतेच्या विंधण विहीरीची क्षमता चाचणी हातपंपाद्वारे १ तास सरपंच / सचिव ग्रामपंचायत यांचे समक्ष घेण्यात यावी व तसे केल्याचे प्रमाणपत्र देयकासोबत सादर करावेत. अन्यथा क्षमता चाचणीची रक्कम देय राहणार नाही. क्षमता चाचणी समाधानकारक केली नसल्याचे आढळल्यास उपअभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांचे कार्यालयाचे प्रतिनिधी समक्ष करावी लागेल व या संबंधीचे प्रमाणपत्र देयका सोबत जोडण्यात यावे. |
| २२ | हातपंप बसेपर्यंत विंधन विहीर कॅप लावून चांगल्या स्थितीत ठेवणे ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील. विंधण विहीर बुजल्याचे (खराब झाल्याचे) आढळल्यास ०८ दिवसाचे आत विंधण |

| | |
|---|---|
| | विहीर साफ करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या करिता त्यांना अतिरिक्त रक्कमेची अदायगी देण्यात येणार नाही. |
| २३ | स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मा. खासदार व आमदार यांच्या निधीतून घेण्यात येणाऱ्या विंधण विहीरीवर विंधण विहीरी संबंधी माहिती काम ज्या निधीतून घेण्यात आलेले आहे. त्याबाबतची माहिती फलक विहीत माहितीसह बसविण्यात यावा. |
| २४ | कुठल्याही कारणास्तव कंत्राटदाराने अर्धवट सोडलेल्या कामाची अदायगी त्यांना करण्यात येणार नाही व अशा परिस्थितीत हे काम इतर यंत्रणे मार्फत करुन घेण्यात येईल. |
| २५ | कामाची अदायगी हे काम पुर्ण झाल्याचे कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी परिक्षण केल्यानंतर व उप अभियंता (यां), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी क्षेत्रीय तपासणी केल्यानंतरच करण्यात येईल. |
| २६ | विंधण विहीर पूर्ण केल्या पासूनच्या ०६ महिन्यांच्या कालावधीमध्ये हातपंप किंवा विंधण विहीरीत काही त्रुटी आढळल्यास कंत्राटदार यांनी उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सातारा यांचेकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर पुर्णपणे त्रुटी स्वखर्चावर दुरुस्त करुन घ्यावी. जर कंत्राटदाराने सुचनेत नमूद केल्याप्रमाणे विहीत कालावधीत त्रुट्या दुरुस्त करुन दिल्या नाहीत तर अशा परिस्थितीत उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी शासकीय यंत्रणा किंवा इतर यंत्रणेकडून कंत्राटदाराच्या खर्चावर दुरुस्त करुन घेतील. कंत्राटदाराने अशा प्रमाणे खर्च झालेली रक्कम मागणी प्रमाणे जमा करावी. उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी प्रमाणित केलेली रक्कम ही कार्यालयात जमा करणे हे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. |
| २७ | विंधण विहीरीचे खोदाई (संलग्न कामासह) कामे करतेवेळी कुठल्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस जिल्हा परिषद, सातारा जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदार नुकसान भरपाईस कंत्राटदार जबाबदार राहील. |
| २८ | शासनाने मंजूर केलेल्या दरापेक्षा जास्त असलेले दर मंजूर करण्यात येणार नाही. |
| २९ | अर्जदाराशी दराबाबत वाटाघाटी करुन दराचे निर्धारण करण्यात येऊन त्या दराने संचालक भू.स.वि.यं. महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या विहीत नमुण्यात करारनामा करुन द्यावा लागेल. |
| ३० | कामाचे क्षेत्र संपूर्ण सातारा जिल्हा राहील. कामाचे आदेश उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा या कार्यालयाकडून देण्यात येतील. |
| ३१ | प्रत्येक कंत्राटदारास कार्यालयाच्या स्वेच्छेनुसार (Discretion) कामाचे वाटप करण्यात येईल. कामे दिलेल्या मुदतीत व वेळेवर पुर्ण झाल्याशिवाय अथवा कामे अपुर्ण राहिल्यास त्यांची संयुक्तीक कारणे मान्य करुन घेतल्याविना पुढील कामाचे आदेश देण्यात येणार नाही. |
| ३२ | विंधण विहीरीसाठी जास्तीत जास्त ६० मिटर खोलीच्या विंधण कामाचे आदेश देण्यात येतील. |
| ३३ | आदेशात नमुद केलेल्या जागे व्यतिरिक्त तसेच या कार्यालयाचे पुर्व परवानगी शिवाय इतर |

| | |
|---|---|
| | जागेवर विंधण विहीर खोदल्यास त्या कामाची आदायगी करण्यात येणार नाही व त्या करिता कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील. |
| ३४ | आदेशाप्रमाणे केलेल्या विधंण विहीर खुदाई कामाचा साप्ताहिक अहवाल विहीत प्रपत्रात कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा व उपअभियंता (यांत्रिकी), यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, सातारा या कार्यालयांस प्रत्येक शुक्रवारी सादर करणे बंधनकारक राहील त्या शिवाय पुढील कामाचे आदेश देण्यात येणार नाही. |
| ३५ | देण्यात आलेले काम आदेशाप्रमाणे व स्थळ दर्शक नकाशाप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. रॉक सॅम्पलींग प्रत्येक १० फूटावर घ्यावे लागेल व ते पॉलीथीन बॅगमध्ये पॅक करुन व त्यावर सोबत लेबल लावून साप्ताहिक अहवालासोबत कार्यालयांस सादर करणे बंधनकारक राहील. माती दगडाचे नमुण्याचे खोलीप्रमाणे कागदावर स्केच काढून सादर करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे पाण्याचे झोन किती फुटावर किती इंच लागेल याबाबतची चाचणी कमीत कमी १ तास घ्यावी लागेल व त्यांची मोजणी ९० व्ही नॉज स्केलवर करुन तसेच प्रमाणपत्र द्यावे लागेल. |
| ३६ | ज्या ठिकाणचे कामाचे आदेश दिला जाईल, त्या कामाकरिता विंधण यंत्र निर्धारित स्थळी पोहचल्यावर त्याची माहिती व कार्यक्रम संबंधित गट विकास अधिकारी, सभापती, सरपंच, सचिव इत्यादींना त्वरित कळविणे बंधनकारक राहील असे न केल्यास व याबाबत काही तक्रारी उद्भवल्यास कंत्राटदारास जबबादार धरण्यात येईल. |
| ३७ | विंधण विहीर खुदाईचे काम पूर्ण झाल्यावर विंधण विहीरीला मजबूत बोअर कॅप लावून विंधण विहीर सुरक्षित राहील, याची खबरदारी कंत्राटदारास घ्यावयाची आहे. विंधण विहीर मोजणीच्या वेळी विंधण विहीर बुजल्याचे निदर्शनांस आल्यांस कोणत्याही प्रकारची अदायगी करण्यात येणार नाही. |
| ३८ | मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील जनहित याचिका क्र. ३६/२००९ Measure for prevention of fatal accidents of small children due to their falling in abandoned bore well याबाबत दिनांक १६/०८/२०१० ला दिलेले निर्देश व मा.संचालक, भू.स.वि.यं. पुणे यांचेकडील पत्र क्रमांक आवेधन/कक्ष-२/न.कृ.वि.वि./अपघात/ ५०४३/२०१० दिनांक ०६/१०/२०१० अन्वये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार कंत्राटदाराने कार्यवाही करावी. |
| ३९ | विंधण यंत्र वाहनावरील वाहन चालक, ड्रिलर तसेच इतर कामगार हे कामाचा अनुभव असलेले असावेत. तसेच त्यांचेकडे आवश्यक परवानगी (लायसन्स) प्रमाणपत्र इ. असावेत. झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस नुकसानीस संबंधित कंत्राटदार जबाबदार राहील. जिल्हा परिषद, सातारा कडून कोणतीही नुकसान भरपाई अदा केल्या जाणार नाहीत. तसेच शासकीय विमा निधीचे नियमानुसार कंत्राटदाराकडे असलेल्या कामगारांचा विमा काढणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |
| ४० | विंधन विहीरीचे केसींग पाईपचे दर हे ग्राऊटींगसहीत असल्याने प्रत्येक विंधण विहीरीस |

| | |
|---|---|
| | ग्राऊटींग करणे बंधनकारक राहील. |
| ४१ | विक्रीकर आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र. विआ (कावनि) कार्यकंत्राट/२००९-२०१०/१३/प्रशा-६/ब/६१४ दिनांक १४/१०/२०१० अनुसार आणि मुल्यवर्धीत कर (व्हॅट) अधिनियम २००२ च्या कलम .३१ व त्या अन्वय  जारी झालेल्या अधिसुचने नुसार कंत्राटदाराची रक्कम अदा करताना मुल्यवर्धीत कर (Vat) कपात करण्यात येईल. अथवा शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होण्याऱ्या नियमानुसार (Vat) कपात करण्यात येईल. |
| ४२ | करारनामा मंजूर झाल्यापासून ०१ (एक) वर्षापर्यंत अथवा नवीन दर जिल्हा स्तरावर निश्चिती होईपर्यंत ग्राह्य असेल. यापैकी  जो जास्त कालावधी आहे तो पर्यंत. |
| ४३ | कोणतेही कारण न देता करारनामा स्विकारण्याचे अथवा नाकारण्यांचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा ह्यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| ४४ | वर दिलेल्या अटीनुसार कंत्राटदारांनी काम न केल्यास किंवा कामात टाळाटाळ केल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| | अ) अनामत/बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |
| | ब) दिलेल्या कामाचा अनुबंध ताबडतोब रद्द करण्यात येईल. |

XXX
**उप अभियंता (यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग,**
**जिल्हा परिषद सातारा**

XXX
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद सातारा**

# <u>बंधपत्र</u>

मी / आम्ही गांभिर्यपूर्वक नमूद करतो की, मी/आम्ही सदर नमूद केलेल्या कामाच्या सर्व अटी व शर्ती क्र. १ ते ४४ काळजीपूर्वक वाचले असून या निविदेसाठी माझे/आमची दर निविदेत असलेल्या प्रपत्रामध्ये (BOQ) नमूद करीत आहे/आहोत.

नोंदणी फॉर्म मध्ये दिलेली माहिती सत्य व अचूक आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास आमची नोंदणी रद्द होईल, जर माझे/आमचेशी करारनामा करणेत आला तर या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी/आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी/आम्ही केल्यास करारनाम्यामध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला/आम्हांस मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक

निविदाधारकाची सही व शिक्का

नाव ----------------------------------------

पत्ता ----------------------------------------

----------------------------------------

XXX
**उप अभियंता (यांत्रिकी)**
**यांत्रिकी उपविभाग,**
**जिल्हा परिषद सातारा**

XXX
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद सातारा**